# येशू बार्तीमय आणि इतरांना बरे करतो

## आजाऱ्यांना आरोग्य मिळावे म्हणून ख्रिस्ती लोक प्रार्थना करतात

मुलांना शिकवणाऱ्यांनी H2b हा अभ्यास वाचावा.



**प्रार्थना:** ''प्रिय स्वर्गीय पित्या तुझे आम्हा विश्वासणाऱ्यांवरील प्रेम कधीच कमी होत नाही. माझे लोक आजारी पडतील, त्यांना दु:ख होईल तेव्हा त्यांनी तुझ्यावर भरंवसा ठेवावा यासाठी त्यांचे साहाय्य कर.

1. **आजारी व दु:खितांची सेवा करण्यासाठी तुमच्या मंडळीचे मार्गदर्शन करण्याकरीता तयारी करा.**

जिथे मोठया संख्येने लोक ख्रिस्ती विश्वासणारे होतात आणि नवीन मंडळ्यांचे रोपण होते तिथे शारीरिक आरोग्य हा सुवार्ता प्रसार आणि उपासकांच्या जीवनाचा एक सर्वसाधारण भाग होतो.

विश्वासणारे आजारी पडतात किंवा त्यांना दु:ख होते तेव्हा त्यामागे देवाचा नेहमीच काही हेतू असतो. हा देवाचा हेतू ओळखून त्याच्यावर विश्वास ठेवण्यास शिकण्याकरीता मंडळीला मदत करणे हे आमचे काम आहे.

**मार्क 10:46-52 मध्ये पाहा...**

- बार्तीमयाचा आजार किती गंभीर होता.
- येशूला लोकांसाठी काय करता येते असा बार्तीमयाचा विश्वास होता.
- बार्तीमयने काय विनंती केली.
- बार्तीमयच्या कोणत्या गोष्टीचा कळवळा येऊन येशूने त्याची विनंती मान्य केली.

**योहान अध्याय 9 मध्ये पाहा...**

- त्या माणसाला आंधळे जन्माला घालण्याभागे देवाचा काय हेतू होता (व. 1-3)
- बरे होण्यासाठी आंधळ्या माणसाने काय करायचे होते. (6-11)
- आंधळ्या माणसाने येशूवर काय म्हणून विश्वास ठेवावा अशी येशूची इच्छा होती. (35-38)
- येशूवर विश्वास ठेवण्यास नकार देणाऱ्यांबद्दल देवाचा उद्देश काय होता. (39-41)

**इब्री 12:5-14 मध्ये पाहा...**

- दु:ख सहन करणाऱ्या विश्वासणाऱ्यांकडे पाहण्याचा देवाचा दृष्टीकोन कसा असतो (वचने 5-8)
- आमच्या दु:खातून देव कोणत्या चांगल्या गोष्टी पुढे आणणार असतो (9-11)
- आमची वागणूक वाकडेपणाची असेल तर आम्ही काय केले पाहिजे. (13)
- आम्ही इतरांशी वाईट वागलो असू तर आम्ही काय केले पाहिजे (14).

**याकोब 5:13-20 मध्ये पाहा....**

- विश्वासणारे दु:ख भोगीत असतात तेव्हा त्यांनी काय केले पाहिजे. (व 13)
- विश्वासणारे आजारी पडतात तेव्हा त्यांनी काय करावे. (14)
- आजारी विश्वासणाऱ्यांसाठी उपासकांच्या पुढाऱ्यांनी काय करावे (14)
- आजारी विश्वासणाऱ्यांनी पातक केले असेल तर त्यांनी काय केले पाहिजे (15)
- आजारी विश्वासणाऱ्यांना बरे करणाऱ्या प्रार्थनेचा प्रकार. (15)
- पातकी सत्याकडे परत येतो तेव्हा काय घडते (19-20)

**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून आगामी आठवडयातील तुमचे कार्यक्रम ठरवा.**

जेव्हा केव्हा तुम्ही एखादया घराला भेट देता आणी तिथे कोणीतरी आजारी असल्याचे समजते; देवाची कृपा व सामर्थ्याची साक्ष म्हणून आजाऱ्याला आरोग्य मिळण्यासाठी प्रार्थना करा. मंडळीच्या प्रत्येक पुढाऱ्याने एका लहानशा बाटलीत स्वच्छ तेल घ्यावे आणि विश्वासणाऱ्यांच्या घारी बोलावले जाईल तेव्हा आजाऱ्याला ते तेल लावून प्रार्थना करा.

तुमच्या मंडळीतील आजारी व दु:ख भोगणाऱ्या विश्वासणाऱ्याला जाऊन भेटा, त्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

**आरोग्यासाठी मार्गदर्शक तत्वे**

तुम्ही आजारी व दु:ख भोगीत असणाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास जाल तेव्हा पुढील काही मार्गदर्शक तत्वे पाळा.

अ) आजारी माणसासाठी प्रार्थना करून झाल्यावर तुम्ही जेवणासाठी किंवा अन्य काही कामासाठी तिथे थांबू नका.

ब) आजारी माणूस व त्याच्या कुटुंबियांशी बोलून आजारी विश्वासणाऱ्याची वागणूक, नातेसंबंध व धार्मिक रिवाजांची माहिती घ्या, यामुळे कदाचित शारीरिक आजाराचे आध्यात्मिक कारण तुम्हांला समजू शकेल.

क) पवित्र आत्मा तुम्हांला आजाराचे कारण तसेच आजारी माणसाबद्दल देवाची इच्छा काय आहे हे कळविल, ते ऐका.

ड) आजारी माणसाला तीन प्रकारचे आजार असतात हे स्पष्ट करून सांगा:

- न्यायासाठी आजारपण, कारण आमची वर्तणूक किंवा नातेसंबंध यामुळे प्रभू दुखावला जातो
- मृत्यूसाठी आजारपण, कारण आम्ही प्रभूकडे जाव्याची वेळ आलेली असते.
- देवाच्या गौरवासाठी आजारपण, कारण आरोग्य देऊन आपले सामर्थ्य दाखवण्याची त्याची इच्छा असते.

ई) आजारी व्यक्ती, कुटुंबातील सदस्य आणि एकमेकांना त्यांनी पातके केली असतील तर ती कबूल करण्यास संधी द्या, कोणी पातकांची कबूली दिली असेल तर प्रभूने पापांची क्षमा केली असल्याचे त्यांना संगा,

फ) आजाराचे कारण तुम्हांला समजले असेल तर आजारी व्यक्तीला मार्गदर्शन करून सात्विकपणे कसे वागायचे आणि इतरांशी असलेल्या नातेसंबंधात कशी सुधारण करायची हे सांगा.

ग) आजारी व्यक्तीसाठी प्रार्थना करा. आजाऱ्याला आरोग्य देण्याची देवाची इच्छा आहे असे तुम्हांला वाटले तर तेल लावून देवाला आजाऱ्याला आरोग्य देण्याची विनंती करा. (उपचार डॉक्टर्स औषधे केवळ देवाची इच्छा नाही असे तुम्हांला वाटले तर देवाने आजारी व्यक्तीला विश्वास, सहनशक्ती व आनंदाचा आशीर्वाद दयावा यासाठी प्रार्थना करा.

**3. तुमच्या सहकाऱ्याशी चर्चा करून पुढच्या उपासनेची वेळ ठरवा.**

देव येशूच्या नावात कशा प्रकारे आजाऱ्याला आरोग्य देतो तुम्हांला याबद्दल झालेले आकलन स्पष्ट करून सांगा. लूक 17:11-19 मधून दहा कुष्ठरोग्यांचा वृत्तांत वाचा.

विश्वासणाऱ्यांनी नुकतेच अनुभवलेल्या आरोग्या विषयी धन्यवाद व साक्ष द्यावी.

मुलांनी तयार केलेली नाटिका कविता किंवा प्रश्न सादर करावेत.

प्रभुभोजन घेतो तेव्हा ज्याला मान्ना म्हणतात, अशी दैवी भाकरीस देवाने इस्त्रारलास कसे दिले त्याची गोष्ट वाचा किंवा सांगा



येशूने दहा कुष्ठराग्यांना बरे केले. पण त्यातील केवळ एकयजण त्याचे आभार माणण्यास परत आला.

पाठ करा 1 पेत्र 2:24.

लहान गट तयार करा आणि विश्वासणाऱ्यांनी एकमेकांना प्रोत्साहन देऊन प्रार्थना करावी.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net